रे.दि.मु.नं. ४१/१०

मगबुल गुलाब इनामदार (मुलाणी) वगैरे

**विरूध्द**

मुस्तफा निजाम उर्फ निजामुद्दीन इनामदार वगैरे

## निशाणी ५ खालील आदेश

**१.** प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या कलम ३९ नियम १ व २ नुसार दाखल करण्यात आला आहे.

**२. वादी यांचे थोडक्यात कथन असे की,** वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी दावा मिळकती हस्तांतरीत करू नयेत याबाबत तुर्तातुर्त ताकीद मागण्यासाठी दाखल केला आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा मौजे बावधन ता.वाई जि. सातारा येथील शेतजमीनी व घरमिळकती खालीलप्रमाणे.....

| अ.नं. | जुना गट नं. | नविन गट नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पै. | हिस्सा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०३ | २०३ | १.११ | ७.८१ | संपूर्ण |
| २ | १३२५ | १३३८ | १.०९ | १३.६९ | संपूर्ण |
| ३ | ११३६/१२ | ११४७/१२ | ४ ९२ | ५९.१० | १आणे ८ पै. |
| ४ | १४८२ | १४९६ | १.७२ | ८:३२ | ४ आणे |

**३.** तसेच मौजे बावधन ता.वाई येथील ग्रामपंचायत मिळकत नं. १३८५ उ.मु.ब.का.तिघई दुमजली खण तीन एकूण खण ९ अशी इमारत, तसेच ग्रामपंचायत मिळकत नं. १३८७ पडिक जागा व शेड खन सोपा, व ग्रामपंचायत मिळकत नं. १३९० सिनेमाथिएटर इमारत इत्यांदी मिळकती. वर नमूद मिळकतींचा एकत्रात सिटी सर्व्हे नं. १३०, १३१, १७१, १७२, १२३ असा आहे. तसेच सर्व दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे पुर्वज बाळाभाई दादा मुलाणी यांचा मालकी हक्क कब्जे वहिवाटीच्या होत्या. त्यांचे नंतर सदर मिळकती या वडिलार्जीत हक्काने वादीस व प्रतिवादी १ ते ४ यांचे कब्जेवहिवाटीतस आलेल्या आहेत.

**४.** बाळाभाई दादा मुलाणी हे दि. ०४/०३/१९३९ रोजी मयत झाले. त्यांना अब्बास व गुलाब ही दोन मुले होती. वडिलार्जीत मिळकती या बाळाभाई मुलाणी यांचे मृत्यूनंतर मोठा मुलगा म्हणून अब्बास यांच्या नावे एकत्र कुटूंब मॅनेंजर म्हणून आलेल्या आहेत परंतू सदर मिळकतीमध्ये वादी नं. १ ते ८ यांचा १/२ हिस्सा होता व आहे. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी नं. १ ते ४ यांचे वडिलार्जीत मिळकत आहे. सर्व वादींनी वडिलार्जीत मिळकतीमधील त्यांचा असणारा १/२ हिस्सा एकत्रात वाटप करून मागितला आहे. वादी व प्रतिवादी हे एकत्रात राहत होते व एकत्रातील कुटूंबातील व्यवसायातूनच व शेतीचे उत्पन्नातून त्यांनी वाद मिळकती खरेदी केलेल्या आहेत. त्यामुळे वडिलार्जीत उत्पन्नातूनच त्यांनी दाव्यातील मिळकत नं. ५ ते ७ या बांधलेल्या आहेत. वादीस सदर मिळकती मधील १/२ हिस्सा मागणेचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. बाळाभाई मुलाणी यांची मुले अब्बास व गुलाब ही कायमपणे एकत्रातच राहत होती. गुलाब हे नोकरीनिमित्ताने परगावी होते.

दरम्यानचे काळात अब्बास हा शेतीतील उत्पन्न देत होता व गुलाब हा देखील नोकरीतील येणारे उत्पन्न हे एकत्र कुटूंबासाठी खर्च करत असे. वादीचे चुलते अब्बास हे दि. २८/०३/१९६९ रोजी मयत झाले त्यांचे मृत्यूचे नंतर दावा मिळकतींना अब्बास यांचे वारस यांचीच नोंद झाली परंतू नजर चुकीने वादींची नोंद रेव्हेन्यू रेकॉर्डसदरी झाली नाही वस्तुतः अब्बास बाळाभाई मुलाणी ही बाळाभाई दादा मुलाणी यांचे सर्व वारस यांचे करीता ए.कु.म्या. म्हणून झालेली आहे.

५. वादीचे वडिल व आजोबा हे त्यांचे सासरे यांचे गावी राहत होते कारण अब्बास ची पत्नी व गुलाबची पत्नी यांचे आपसात पटत नव्हते. वादीचे वडिल व चुलते हे वेगळे राहत असले तरी वडिलार्जीत मिळकतीचे अद्यापी वाटप झालेले नाही. वादीचे चुलते हे वेळोवेळी त्यांचा भाउ म्हणजेच वादींचे वडिल यांचा पानउतार करून वेळप्रसंगी त्यांना मारहाण करत असत. अब्बास याचा मुलगा निजाम हा अडदांड व कायद्यास न जुमानणारा व अरेरावी करणारा खुन, दडपशाही वृत्तीचा असल्याने प्रतिवादी १ ते ४ व त्यांचे पुर्वज यांनी शेतीतील थोडे फारच उत्पन्न वादींना दिले परंतू वाद मिळकतीचे वाटप करून दिले नाही. दावा मिळकतीचे रेकॉर्ड सदरी वादीचे वडील गुलाब यांची नोंद प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी त्यांचेराजकारणी व रेव्हेन्यु अधिकारी यांचेवर वर्चस्व असल्याने व तयांना हाताशी धरून वादींचे नावाची नोंद होवू दिलेली नाही. वादीचे वडिल हे दि. १८/१०/१९७७ रोजी मयत झाले आहेत व वादी हे नोकरी निमीत्ताने परगावी राहत असल्याने त्यांनी रेकॉर्ड पाहिले नाही. दावा मिळकतीमध्ये वादीचा कायदेशीरपणे १/२ हिस्सा आहे. सदर हिस्सा मागणेकामी त्यांनी दि. ०९/०३/२००९ रोजी रजिस्टर पोस्टाने प्रतिवादी नं. १ ते ४ यांना

नोटीस पाठवून वडिलार्जीत जमीनींचे वाटपाची मागणी केली. सदर नोटीस प्रतिवादींना मिळून देखील त्यांनी दवा मिळकतीचे वाटप करून दिलेले नाही. सबब वादीस प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडत आहे. परंतू दाव्याचा गुणदोषावर निकाल होणेस वेळ जाणार आहे. दरम्यानचे काळात दावा मिळकत प्रतिवादी यांनी अथवा त्यांचे नोकरी, चाकर, एजंट मुखत्यांनी यांनी कोणत्याही इसमांना गहाण, दान, खरेदीपत्र साठेखत, इसारपावती, बक्षीसपत्र, दानपत्र, तबदीली हस्तातंरकरू नयेत अशी त्यांचे विरूध्द तुर्तातुर्त ताकीद देण्यात यावी याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**६.** सदर कामी प्रतिवादींना हजर रहाण्याकरिता न्यायालयामार्फत समन्स काढण्यात आले. प्रतिवादी क्र. १ व ३ ते ३३ यांना समन्सची बजावणी होवून देखील ते प्रस्तुत दाव्याचे कामी हजर झाले नाहीत. सबब नि. १ वर सदर प्रतिवादींच्या विरूध्द दावा एकतर्फा चालविण्यात यावा असा आदेश पारीत करणेत आला. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं. २ हे हजर झाले. सदर प्रतिवादी नं. २ यांनी नि. ५ चे तुर्तातुर्त ताकीद अर्जावर असे स्पष्टपणे लिहून दिले की, भविष्यात सदरचा प्रतिवादी दावा मिळकतींबाबत खरेदी विक्रीचा व्यवहार दाव्याचा निर्णय होईपर्यत करणार नाही.

७. **प्रतिवादी क्र. २ यांचे थोडक्यात कथन असे की,** वादींचा दाव्यातील व तुर्तातुर्त ताकीद अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असून तो या प्रतिवादींना मान्य व कबूल नाही. तसेच प्रतिवादींनी वादींची सर्व कथने पूर्णपणे नाकारलेली आहेत.

८. **खरी वस्तुस्थिती अशी की,** वादी यांनी दाव्यासोबत वंशावळ दाखल केली आहे ती बरोबर आहे. मात्र वंशावळीत दर्शवलेप्रमाणे अब्बास आणि गुलास यांचेत जे वाटप पूर्वी झाले होते व त्यांना वाटपात ज्या मिळकती बाळाभाई दादा मुलाणी यांचेकडून मिळाल्या होत्या त्या त्यांनी दाव्याचे कामी दाखल केल्या नसलेचे निदर्शनास येत आहे. बाळाभाई दादा मुलाणी यांच्या असणारे मिळकतींचे त्यांची मुले आब्बास व गुलाब हेच वारस होते. गुलाब बाळाभाई मुलाणी यांना वाटपात आलेल्या मिळकती त्यांनी तसेच त्यांचे वारस वादी यांनी वेळोवेळी विक्री केल्या आहेत त्यामुळे त्यांचेकडे काहीही मिळकती शिल्लक नाही. आब्बास यांनी व त्यांचे वारसांनी त्यांना वाटपात आलेल्या मिळकती या सांभाळल्या आहेत त्यामुळे सदरच्या मिळकती आज आब्बास यांचे वारसांचे नावावर दिसत आहेत. केवळ त्यांचे नावावर आता कोणत्याही मिळकती नसलेने त्याचा गैरफायदा घेवून वादींनी हा खोटा दावा दाखल केला आहे. दाव्यातील मिळकत अ.नं. १,५,६,७ या मिळकतील आब्बास व गुलाब यांचे वाटपात आब्बास यांना वाटुन आलेल्या मिळकत असून त्यांचेशी वादीचा काहीही संबंध नाही. तर अ.नं. २,३,४ या मिळकती प्रतिवादी नं. १ ते ३ यांच्या खेरीदच्या मिळकती आहेत त्यामुळे त्याचेशी वादीचा काहीही संबंध नाही. दावा मिळकती वादी प्रतिवादींच्या वडिलार्जीत नाहीत. या प्रतिवादी नं. १ ते ३ चे पुर्वहक्कदार आब्बास यांचे एकटयाचे वाटणीच्या मिळकती आहेत. त्यामुळे खरेदी मिळकती या वादींना वाटुन मागणेचा हक्क अधिकार नाही. आब्बास आणि गुलास यांचेत आपसात वाटप झालेने दोघेही वेगळे राहत होते व वाटपाप्रमाणे दोघेही त्यांना आलेल्या मिळकती वहिवाटत होते. गुलाब यास वाटून आलेल्या मिळकत

त्यांने ति—हाईत इसमांना विक्री केल्या आहेत. आब्बास आणि गुलाब यांचेत वाटप झालेले असलेने वादींना वाटप करून देणेचे कधीही कारण झालेले नाही. दावा मिळकती या आब्बासचे वाटणीस आलेने त्यांचे रेकॉर्डसदरी आब्बासचे नाव त्यांचे कुटूंबासाठी ए.कु.मॅ. म्हणून लागलेले आहे. त्याचेशी वादीचा काहीही संबंध नाही. वादीची नोटीस ही चुकीच व खोटी आहे. या प्रतिवादीस नोटीस कधीही मिळालेली नाही. वादींनी विनाकरण दावा दाखल केला आहे. सबब वरील सर्व कारणांचा विचार होवून तो खर्चासह रद्द करणेत यावा.

**९.** दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधी केलेल्या कथनांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझया विचारार्थ आले. मी खाली दिलेल्या कारणास्तव त्यांच्या समोर निष्कर्ष नोंदविले.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रथमदर्शनी प्रस्तुत अर्ज किंवा दावा वादींच्या बाजूने आहे हे वादी सिध्द करतात काय ? | होकारात्मक |
| २ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे हे वादी सिध्द करतात काय ? | होकारात्मक |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होउ शकते हे वादी सिध्द करतात काय ? | होकारात्मक |
| ४ | काय आदेश ? | खालीलप्रमाणे |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्र. १ ते ३ करिता.

**१०.** तिन्ही मुद्दयाची कारणमिमांसा पुनरावृत्ती टाळण्याकरिता मी त्यांची चर्चा एकत्रीतरित्या करत आहे. मी वादींचे विद्वान वकील

श्री.एस.सी.खडसरे तसेच प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.एम.बी. देशपांडे यांचा युक्तीवाद ऐकला.

## दाखल केलेली कागदपत्रे

**११.** वादींनी आपली बाजू सिध्द करण्याकरिता नि. ८ ला मौजे बावधन ता.वाई येथील गट नं. २०३ चा ७/१२ चा उतारा, नि. ९ ला मौजे बावधन ता.वाई येथील गट नं. १३३८ चा ७/१२ चा उतारा, नि. १० ला मौजे बावधन ता.वाई येथील गट नं. ११४७/१२ चा ७/१२ चा उतारा, नि. ११ ला मौजे बावधन ता.वाई येथील गट नं. १४९६ चा ७/१२ चा उतारा, नि. १२ ला मौजे बावधन ता.वाई येथील गट नं. १३८५ चा ग्रामपंचायत नमुना नं. ८ चा उतारा, नि. १३ ला मौजे बावधन ता.वाई येथील गट नं. १३८७ चा ग्रामपंचायत नमुना नं. ८ चा उतारा, नि. १४ ला मौजे बावधन ता.वाई येथील गट नं. १३९० चा ग्रामपंचायत नमुना नं. ८ चा उतारा इत्यांदी उतारे दाखल केलेले आहेत. तसेच नि. ३९ ला वादीने प्रतिवादींना पाठविलेली नोटीसची प्रत दाखल केली आहे. नि. ४० ला नोटीस पाठविलेली पोस्टाची रजिस्टर पावती दाखल केली आहे. नि. ४१ ला प्रतिवादीस पाठविलेल्या नोटीसची यु.पी.सी.ची प्रत दाखल केली आहे. नि. ४२ ला बाळा दादा मुलाणी यांचा मृत्यूचा उतारा दाखल केला आहे. तसेच नि. ४ लगत वादीचे मुखत्यारपत्र दाखल केले आहे. नि. ७४ ला मौजे बावधन येथील सर्व्हे नं. ४८ चा ७/१२ चा उतारा, नि. ७५ ला मौजे बावधन येथील सर्व्हे नं. ४००/१ चा ७/१२ चा उतारा, नि. ७६ ला मौजे बावधन येथील सर्व्हे नं. ४१९/१३ चा ७/१२ चा उतारा, नि. ७७ ला मौजे बावधन येथील सर्व्हे नं. ६६६ चा ७/१२ चा उतारा, नि. ७८ ला मौजे बावधन येथील गट नं. २०३ व १२३२ चा ७/१२ चा उतारा, नि.

७९ ला मौजे बावधन येथील गट नं. ११३६/१२ चा स्किमचा उतारा, इत्यांदी उतारे दाखल केलेले आहेत.

**१२.** सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं. २ हे हजर झाले. सदर प्रतिवादी नं. २ यांनी नि. ५ चे तुर्तातुर्त ताकीद अर्जावर असे स्पष्टपणे लिहून दिले की, भविष्यात सदरचा प्रतिवादी दावा मिळकतींबाबत खरेदी विक्रीचा व्यवहार दाव्याचा निर्णय होईपर्यत करणार नाही. प्रतिवादी क्र. २ यांनी आपली बाजू सिध्द करण्याकरिता कोणतेही दस्तऐवज दाखल केलेले नाहीत.

**१३.** दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधी केलेली कथने व दाखल केलेल्या दस्तऐवजावरून असे दिसून येते की, वादी हे गुलाब म्हणजेच बाळाभाई दादा मुलाणी यांच्या मुलाची मुले आहेत. प्रतिवादी हे बाळाभाई दादा मुलाणी यांचा मुलगा नामे आब्बास व त्यांचा मुलगा निजामुद्दीन म्हणजेच वादी क्र. ४ यांचे तसेच शहाबुद्दीन व मुस्तफा यांची मुले आहेत. वादींनी दावा मिळकती या वादी व प्रतिवादी नं. १ ते ४ यांचे वडिलार्जीत मिळकत आहे. सर्व वादींनी वडिलार्जीत मिळकतीमधील त्यांचा असणारा १/२ हिस्सा एकत्रात वाटप करून मागितला आहे. वादी व प्रतिवादी हे एकत्रात राहत होते व एकत्रातील कुटूंबातील व्यवसायातूनच व शेतीचे उत्पन्नातून त्यांनी वाद मिळकती खरेदी केलेल्या आहेत. त्यामुळे वडिलार्जीत उत्पन्नातूनच त्यांनी दाव्यातील मिळकत नं. ५ ते ७ या बांधलेल्या आहेत. वादीस सदर मिळकती मधील १/२ हिस्सा मागणेचा कायदेशीर हक्क व अधिकार आहे. सदर कामी प्रतिवादींना हजर रहाण्याकरिता न्यायालयामार्फत समन्स काढण्यात आले. प्रतिवादी क्र. १ व ३ ते ३३ यांना समन्सची

बजावणी होवून देखील ते प्रस्तुत दाव्याचे कामी हजर झाले नाहीत. सबब नि. १ वर सदर प्रतिवादींच्या विरूध्द दावा एकतर्फा चालविण्यात यावा असा आदेश पारीत करणेत आला. सदर दाव्याचे कामी प्रतिवादी नं. २ हे हजर झाले. सदर प्रतिवादी नं. २ यांनी नि. ५ चे तुर्तातुर्त ताकीद अर्जावर असे स्पष्टपणे लिहून दिले की, भविष्यात सदरचा प्रतिवादी दावा मिळकतींबाबत खरेदी विक्रीचा व्यवहार दाव्याचा निर्णय होईपर्यत करणार नाही. वरील परिस्थीतीवरून जो पर्यत बाळाभाई दादा मुलाणी यांचे मिळकतीचे वाटप होत नाही तोपर्यत कोणत्याही हिस्सेदाराने मिळकत विकल्यास दाव्यामध्ये गुंतागुंती निर्माण होणार आहे. वरील सर्व परिस्थीतीमध्ये वादींचा अर्ज हा मंजूर होण्याजोगा आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारात्मक देवून मुद्दा क्र. ४ साठी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१.** अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादींनी अथवा त्यांचे नोकर, चाकर, एजंट, मुखत्यांनी यांनी कोणत्याही इसमास गहान, दान, लिज, लिन, खरेदीखपत्र, साठेखत, इकरारपत्र, इसारपावती, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, दानपत्र इत्यांदी दस्तऐवजांनी ति—हाईत इसमांना तबदीली हस्तातंरण करू नये अशी दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यत तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते.

**३.** खर्च अंतिम न्यायनिर्णयावेळी गणला जाईल.

(पंकज प. नायगांवकर)

दि.२५/११/२०१३ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,वाई.